## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२२ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रशाळांमधील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा शनिवार दि. २५ जानेवारी रोजी विद्यापीठात आयोजित करण्यात आला आहे. सलग दुसऱ्या वर्षी हा मेळावा होत आहे.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात सकाळी १० वाजता या माजी विद्यार्थी मेळाव्याचे उद्घाटन होणार असून कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी अध्यक्षस्थानी असतील यावेळी भारत सरकारच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे उपसंचालक सत्यविनायक मुळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून अंकलेश्वरच्या झेंटीव्हा प्रा.लि.च्या जागतिक नियामक प्रकरण तज्ज्ञ डॉ.भारती पाटील या विशेष अतिथी असतील. ६०० पेक्षा अधिक विद्यार्थी या मेळाव्यात सहभागी होण्याची शक्यता आहे. दुपारच्या सत्रात हे विद्यार्थी आपआपल्या प्रशाळांमधील सध्याच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. अशी माहिती या मेळाव्याचे समन्वयक प्रा.किर्ती कमळजा, प्रा.पवित्रा पाटील व डॉ. विशाल पराते यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि.२२ ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव संचलित, महात्मा तत्वज्ञान केंद्र, धुळे यांच्यावतीने महात्मा गांधी पुण्यतिथीचे औचित्य साधून राष्ट्रीय स्तरावर ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी १) महात्मा गांधी मानवता की आशा, २)भारतीय साहित्य में गांधी दर्शन की प्रस्तुति, ३)महात्मा गांधीजी के विचारो की प्रासंगिकता, ४)मानव प्रवृत्तियों के परिवर्तन में गांधी दर्शन की उपादेयता, ५)विश्व मंच पर बदलते भारत की दस्तक असे पाच विषय देण्यात आले आहेत. राष्ट्रीय स्तरावरील ही स्पर्धा मराठी, हिन्दी व इंग्रजी या माध्यमातून घेण्यात येईल. देशातील विद्यापीठ, कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालयातील तसेच मान्यता प्राप्त परीसंस्थेतील प्रत्येकी १० स्पर्धकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. निबंधासाठी शब्द मर्यादा १५०० अशी राहील. स्पर्धेसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नसून सदर स्पर्धा ऑनलाईन व ऑफलाईन दोन्ही पध्दतीने घेण्यात येईल. सदर स्पर्धेत प्रथम पारितोषिक- रुपये २१००/- रोख व प्रमाणपत्र, व्दितीय पारितोषिक रुपये ११००/- व प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक रुपये ७५०/- व प्रमाणपत्र तसेच उत्तेजनार्थ पारीतोषिक रुपये २५१/- व प्रमाणपत्र

तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना ऑनलाईन पध्दतीने सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. ऑनलाईन निबंध लेखनासाठी हिन्दी आणि मराठी निबंध युनिकोड फॉण्ट मध्ये टाईप केलेला असावा तसेच इंग्रजी निबंध Times in New Roman या फॉण्ट मध्ये टाईप केलेला निबंध असावा ऑनलाईन निबंधाची PDF व Word File https://forms.gle/SJDLWDfzUPhUNVaU8 या गुगल लिंकवर अपलोड करुन टाईप केलेला निबंध-vijayloharhindi@gmail.com या ई-मेल वर पाठवावेत. तसेच स्पर्धकांनी निबंधाच्या मुख पृष्ठावर स्वतःचे व महाविद्यालयाचे नाव भ्रमणध्वनी क्र. व ई-मेल अचूक लिहावा.

विद्यार्थ्यांनी वरील ५ पैकी कोणत्याही एका विषयावर निबंध स्व-हस्ताक्षरात व सुवाच्य अक्षरात लिहून किंवा संगणकावर टाईप करुन आपल्या महाविद्यालय/विभागामार्फत दिनांक १० फेब्रुवारी २०२५ पर्यंत महात्मा गांधी तत्त्वज्ञान केंद्र, मालेगाव रोड, निसर्गोपचार केंद्रासमोर, धुळे येथे प्रत्यक्ष किंवा पोस्टाने / कुरीयर व्दारे पाठवावेत असे आवाहन केंद्राचे कार्याध्यक्ष, प्राचार्य डॉ. पी. एच. पवार व कार्यकारी संचालक डॉ. संजय ढोडरे तसेच केंद्राचे सल्लागार समिती सदस्य डॉ. विजय लोहार यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी केंद्राचा कार्यालयीन दुरध्वनी क्र. ०२५६२-२४०६४१ व केंद्राचे कार्यकारी डॉ. संजय ढोडरे यांच्या भ्रमणध्वनी क्र. ९८२२५३३६४२ वर संपर्क साधावा.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ दि २२ जानेवारी २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी